महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १३९ वे | दिनांक : १४/०५/२०२६ | वार : गुरुवार

## फॅन-कुलर बंद करा, मग कळेल! - देवेंद्र फडणवीस संतापले; मुलींची अडचण सोडवली



**नागपूर** :शांत आणि संयमी स्वभावाचे व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जाणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस विदर्भातील वसतिगृहातील मुलींच्या प्रश्नावर मात्र चांगलेच संतापल्याचे पाहायला मिळाले. विदर्भातील तापमान ४५ अंशांवर पोहोचलेले असताना वसतिगृहातील मुलींनी कूलर्सची मागणी केली होती, परंतु प्रशासकीय अधिकाऱ्यांनी त्याकडे दुर्लक्ष करत उडवाउडवीची उत्तरे दिली. हा गंभीर प्रकार समजताच मुख्यमंत्र्यांनी तातडीने सूत्रे हलवत प्रशासनाला धारेवर धरले आणि अवघ्या काही तासांतच हा प्रश्न मार्गी लावून विद्यार्थिनींना मोठा दिलासा दिला.

नागपूरच्या बेसा येथील शासकीय मुलींच्या वसतिगृहातील ही स्थिती विदर्भातील कडक उन्हाळ्याचे भीषण वास्तव मांडणारी आहे. बाहेर तापमान ४० ते ४५ अंशांच्या घरात असताना वसतिगृहाच्या खोल्यांचे रूपांतर अक्षरशः भट्टीत झाले होते, ज्यामुळे तिथे राहून स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या आणि उच्च शिक्षणाचे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थिनींना प्रचंड त्रास सहन करावा लागत होता. आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी घरापासून दूर आलेल्या या मुलींसमोर सध्या या अंगाची लाहीलाही करणाऱ्या उकाड्याचे मोठे संकट उभे ठाकले होते.

अंगाची लाहीलाही करणाऱ्या उकाड्यामुळे विद्यार्थिनींची रात्रभर झोप उडाली होती, तर काहींना उष्णतेमुळे त्वचेचे विकारही जडले होते. मात्र वारंवार विनंती करूनही प्रशासन तांत्रिक अडचणींचे पालुपद लावून या मागणीकडे दुर्लक्ष करत होते. अखेर स्थानिक भाजप कार्यकर्त्यांच्या माध्यमातून हा गंभीर विषय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापर्यंत पोहोचला आणि वस्तुस्थिती समजताच त्यांनी आक्रमक पवित्रा घेतला. या प्रश्नावर मुख्यमंत्र्यांनी संताप व्यक्त करत संबंधित अधिकाऱ्यांना कडक शब्दांत जाब विचारला, ज्यामुळे यंत्रणेची चांगलीच धावपळ उडाली.

"आतापर्यंत कुलर का लावले नाहीत? आधी तुमच्या कार्यालयातील फॅन आणि कुलर बंद करा, मग कळेल त्या मुलींना काय सोसावे लागत आहे," अशा कडक शब्दांत देवेंद्र फडणवीस यांनी अधिकाऱ्यांना फटकारताच प्रशासकीय यंत्रणेची मोठी धावपळ उडाली. मुख्यमंत्र्यांच्या या एका संतप्त फोन कॉलमुळे अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या तांत्रिक अडचणी अवघ्या काही तासांत निकाली निघाल्या आणि बेसा येथील शासकीय वसतिगृहात तातडीने कुलर दाखल झाले.

देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सर्वच शासकीय वसतिगृहांमध्ये कुलर बसवण्याचे आदेश दिले. या निर्णयामुळे हजारो विद्यार्थिनींना कडक उन्हापासून मोठा दिलासा मिळाला असून, आपल्या लाडक्या 'देवा'भाऊंबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी विद्यार्थिनींनी पत्रांद्वारे आणि प्रत्यक्ष भेटीतून त्यांचे आभार मानले. एका संवेदनशील लोकप्रतिनिधीने तातडीने घेतलेल्या या निर्णयाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## माझा गुन्ह्याशी काहीही संबंध नाही : राज ठाकरे; ठाणे न्यायालयात नेमके काय घडले



**ठाणे** : २००८ सालच्या रेल्वे भरती आंदोलनाप्रकरणी नोंदवण्यात आलेल्या गुन्ह्याच्या सुनावणीसाठी मनसे अध्यक्ष राज ठाकरे आज ठाणे न्यायालयात हजर झाले होते. यावेळी राज ठाकरेंसह या प्रकरणातील इतर सहा आरोपींचीही उपस्थिती होती. सुनावणीदरम्यान राज ठाकरे यांचा जबाब नोंदवण्यात आला, ज्यामध्ये त्यांनी 'या गुन्ह्याशी माझा कोणताही संबंध नाही' असे न्यायालयात स्पष्ट केले. या प्रकरणाची पुढील सुनावणी १८ मे २०२६ रोजी होणार असून, पुढच्या तारखेला राज ठाकरेंना प्रत्यक्ष न्यायालयात हजर राहण्याची आवश्यकता नसल्याची माहिती त्यांच्या वकिलांनी दिली आहे.

सन २००८ मधील रेल्वे भरती प्रक्रियेदरम्यान मराठी तरुणांच्या नोकऱ्या परप्रांतीयांनी हिरावल्या, असा आरोप करत मनसे कार्यकर्त्यांनी कल्याण स्थानकावर उत्तर भारतीय उमेदवारांना केलेली मारहाण आणि रेल्वेच्या मालमत्तेच्या नुकसानीप्रकरणी आज न्यायालयात महत्त्वाची सुनावणी पार पडली. या आंदोलनादरम्यान परप्रांतीयांना लक्ष्य करणे आणि हिंसाचाराला प्रोत्साहन दिल्याचा ठपका ठेवत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यासह एकूण ७ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता, ज्या संदर्भात आज न्यायालयीन कामकाज झाले.

आंदोलन प्रकरणात राज ठाकरे सोडून इतर मनसे कार्यकर्त्यांवर जे आरोप आहेत, त्याबद्दल न्यायाधीशांनी जबाब वाचून दाखवले. उत्तर भारतीय परिक्षार्थींना मनसे कार्यकर्त्यांनी लाठ्या-काठ्याने मारहाण केली, या मारहाणीत परिक्षार्थींना मार लागला, ते जखमी जाले होते, असे न्यायाधीशांनी जबाबात वाचून दाखवले. त्यानंतर साक्षीदारांचेही जबाब वाचून दाखवण्यात आले. त्यानंतर राज ठाकरे यांनी न्यायालयात स्पष्ट केले की या गुन्ह्याशी माझा काहीही संबंध नाही. आंदोलनावेळी मी नाशिकला होतो, असे ठाकरेंनी स्पष्ट केले आहे.

दरम्यान, या प्रकरणाची यापूर्वीची सुनावणी डिसेंबर महिन्यात पार पडली होती, ज्यामध्ये आपल्याला हा गुन्हा कबूल नसून न्यायालयीन प्रक्रियेला आपण पूर्णपणे सहकार्य करू, अशी भूमिका राज ठाकरे यांनी न्यायालयात मांडली होती; त्यानंतर आज पुन्हा एकदा या प्रकरणाची पुढील सुनावणी पार पडली.

## संभाजीनगरच्या पाणीटंचाईवर ठाकरे गट आक्रमक; पाणीपुरवठा सुरळीत करा, अन्यथा आंदोलनाचा इशारा - अंबादास दानवे

**छत्रपती संभाजीनगर** : शहरातील वाढत्या पाणीटंचाई आणि अनियमित पाणीपुरवठा संदर्भात शिवसेना नेते अंबादास दानवे यांनी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांची भेट घेऊन शहरातील पाणीपुरवठा प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली.

१ जानेवारी २०२६ पासून आजपर्यंत १३३ दिवस झाले असून शहराला किमान ४४ वेळा पाणी मिळणे अपेक्षित होते. मात्र प्रत्यक्षात फक्त १५ ते १६ वेळाच पाणीपुरवठा झाला आहे. प्रशासन तीन दिवसाआड पाणी येते असे सांगत असेल तर नागरिकांना १५ ते १६ दिवसांनी पाणी का मिळत आहे?" असा सवाल दानवे यांनी यावेळी उपस्थित केला.

शहराला दररोज सुमारे २४३ एमएलडी पाण्याची आवश्यकता असताना प्रत्यक्षात केवळ १५१ एमएलडी पाणी उपलब्ध होत आहे. "दोन दिवसांत ३०० एमएलडी पाणी शहरात येत असेल तर दोन दिवसाआड शहरात पाणीपुरवठा होणे अपेक्षित आहे.मात्र नागरिकांना ७ ते ८ दिवसांनी पाणी का मिळते?" असा प्रश्न अंबादास दानवे यांनी उपस्थित केला.

शहराच्या मध्यवर्ती भागातील गुलमंडी आणि शहागंज यांसारख्या भागांत १५ ते १६ दिवसांनी पाणी मिळत असून अनेक भागांत रात्री २ वाजता पाणी सोडले जात आहे. सातारा परिसरातील नागरिकांचे विशेष हाल होत असून तेथे पाण्यासाठी मोठा आर्थिक खर्च करावा लागत आहे. सातारा परिसरात टाक्यांद्वारे पाणीपुरवठ्याची स्वतंत्र व्यवस्था करावी, अशी मागणी शिवसेना पदाधिकारी यांनी केली.


# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार १४ मे २०२६

## इकरा पब्लिक स्कूलच्या रेहान पटेलची राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धेसाठी निवड ; जळगाव जिल्हा संघात स्थान





**जळगाव** : इकरा पब्लिक स्कूलचा उदयोन्मुख खेळाडू रेहान आझाद पटेल याची राज्यस्तरीय आंतरजिल्हा १५ वर्षांखालील मुलांच्या फुटबॉल स्पर्धेसाठी जळगाव जिल्हा संघात निवड करण्यात आली असून, या यशामुळे शालेय स्तरावर आणि क्रीडा वर्तुळात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. ही महत्त्वाची स्पर्धा शिरपूर येथील मिलिटरी स्कूलमध्ये संपन्न होणार असून, जळगाव जिल्हा फुटबॉल संघटनेचे सचिव फारुख शेख यांनी संघाची अधिकृत घोषणा केली आहे. यावेळी खेळाडूंना मार्गदर्शन करताना फारुख शेख यांनी सांगितले की, खेळ हा केवळ स्पर्धा नसून शिस्त, आत्मविश्वास आणि संघभावना शिकवणारा जीवनाचा अविभाज्य भाग आहे; तसेच ग्रामीण व सर्वसामान्य कुटुंबातील खेळाडूंनी कठोर मेहनतीच्या जोरावर राज्यस्तरापर्यंत मजल मारणे ही जिल्ह्यासाठी मोठी अभिमानाची बाब आहे.रेहानने मिळवलेल्या या यशाबद्दल शाळेचे चेअरमन,मुख्याध्यापक, शिक्षक आणि क्रीडा प्रेमींकडून त्याचे विशेष कौतुक होत असून, जळगाव जिल्ह्याचे हे खेळाडू शिरपूर येथे उत्कृष्ट कामगिरी करून जिल्ह्याचे नाव राज्यस्तरावर उज्ज्वल करतील, असा ठाम विश्वास व्यक्त केला जात आहे.

## रावसाहेब आहिरे राज्यस्तरीय सेवा पुरस्काराने सन्मानित



**कन्नड (अरुण थोरात)** : महाराष्ट्र शिक्षक पॅनल च्या वतीने कन्नड येथील शिक्षक रावसाहेब आहिरे यांना राज्यस्तरीय सेवा सन्मान पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून मराठी अभिनेत्री भार्गवी चिरमुले, विशेष अतिथी कवी रोहित शिंगे, कवी गुंजन पाटील , एम एस पी चे अध्यक्ष दिपक चामे, राज्य सचिव सतीश कोळी यांच्या हस्ते शिर्डी येथील कार्यक्रमात हा पुरस्कार सपत्नीक प्रदान करण्यात आला. शैक्षणिक क्षेत्रात सातत्याने केलेले प्रामाणिक कार्य, विद्यार्थ्यांप्रती असलेली तळमळ, समाजाभिमुख दृष्टी आणि शिक्षक म्हणून जपलेली निष्ठा यामुळे त्यांना हा मानाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. याबाबल पुढील शैक्षणिक, सामाजिक आणि संघटनात्मक वाटचालीसाठी श्रीमती सभाहत गटशिक्षणाधिकारी कन्नड, श्री दिवेकर, शि.वि.अ. बाजीराव ताठे शि वि अ कन्नड, देवसिंग राजपूत केंद्रप्रमुख वडनेर, सतीश कोळीसर, चंद्रकांत कुलकर्णी, सचिन अनवडे, दिनेश दाभाडे, मधुकर पवार, राजेंद्र पाटील, योगेश मुळे, दिनेश निकम, संजय पगार, समीर कुलकर्णी, श्री वाघ, विनायक भामरे, शैलेश बैरागी, श्री देशमुख, दयानंद भाऊ, श्री दळवी, प्रकाश भाऊ, सतीश भाऊ, विनोद बागुल, धनंजय बिडाईत आदींनी शुभेच्छा दिल्या आहेत.




## प्रा. जयवंतराव श्रीराम पाटील यांना पीएच. डी प्रदान



**पिशोर** : येथील महात्मा ज्योतिबा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्रा. जयवंतराव श्रीराम पाटील यांना डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची हिंदी विषयात विद्यावाचस्पति (पीएच.डी.) पदवी प्रदान करण्यात आली. डॉ. शेख एस के मुखत्यार एस के वहाब (कला महाविद्यालय, बिडकिन ) यांच्या मार्गदर्शनाखाली "सुनीता जैन के काव्य की संवेदना के विविध आयामों का अनुशीलन" या शीर्षका अंतर्गत शोध प्रबंध सादर केला होता. बहिस्थ परीक्षक प्रा. डॉ. राजेंद्र जाधव ( हिंदी विभाग प्रमुख, कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय, सोनगीर ता.जि. धुळे ) तर अध्यक्ष म्हणून प्रो. डॉ. संजय राठोड ( हिंदी विभाग प्रमुख डॉ बाबासाहेब आंबेडकर विश्वविद्यालय) यांच्या उपस्थित पीएच. डी पदवी जाहिर करण्यात आली. प्रा. पाटील यांनी या पूर्वी देखील नेट व सेट या परीक्षेत यश संपादित करुन आपली योग्यता सिद्ध केलेली आहे. त्यांच्या या यशाबद्दल घाटमाथा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री क. रा. नवले गुरूजी, सचिव गोकुळ दादा मोकासे, कोषाध्यक्ष श्री काकाप्पा मोकासे, श्री. भूषण नवले, श्री. सुनील मोकासे, विद्यालयाचे प्राचार्य श्री एन. आर. नवले, उपप्राचार्य श्रीमती अर्चना नवले, विभाग प्रमुख प्रा. व्ही.बी. वाघ यांच्या उपस्थित पाटील यांचा सत्कार करुन सम्मानित केले. यावेळी डॉ. संजय गायकवाड, प्रा. राजेश भावसार, प्रा. प्रशांत कोतकर, प्रा. विजय सोनवने, प्रा. संतोष जाधव, डॉ. गीताराम पवार, प्रा शहादेव गावडे. प्रा. अमोल निकम, प्रा. ज्ञानेश्वर गर्जे, प्रा. राजश्री पाटील, प्रा. प्रसाद शेलार तसेच शिक्षेकतर कर्मचारी श्री.लक्ष्मण मोकासे, श्री. समाधान मोकासे, यासीन शाह आदिनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

## डॉ. प्रभाकर शेळके यांना 'पद्मपाणि' राज्य पुरस्कार



**जालना** : जेष्ठ साहित्यिक कवी कथाकार नाट्यलेखक डॉ प्रभाकर कडूबा शेळके यांच्या एकूण साहित्य कारकिर्दीबद्दल बीड जिल्ह्यातील पद्मपाणि संस्थेच्या वतीने देण्यात येणारा मानाचा सन्मान या वर्षी जालना जिल्ह्यातील उद्योजक सुदामराव सदाशिवे व साहित्यिक डॉ प्रभाकर शेळके जालना जाहीर करण्यात आला आहे.पुरस्काराचे हे सतरावे वर्षे आहे.दि.१७ मे २०२६ या दिवशी यशवंतराव चव्हाण नाट्यगृह बीड येथे अध्यक्ष सीईओ मा.जतिन रहेमान व उद्घाटक तहसिलदार मा.चंद्रकांत शेळके यांच्या हस्ते राज्य व राष्ट्रीय पुरस्काराचे वितरण होणार आहे.असे पद्मपाणि संस्थेचे अध्यक्ष संयोजक मा.दिलिपराज तरकसे, सचिव सिंधू तरकसे राजकुमार वाघमारे यांनी कळवले आहे.हा पुरस्कार जालना जिल्ह्याचा साहित्य सन्मान आहे.त्यांच्या यशाबद्दल सौ सुनीता शेळके/काटकर, रामभाऊ शेळके,दुर्गेश शेळके, पुजा विश्वनाथ गायकवाड,प्रा.राजेंद्र देशमुख कुलदिप रूघे, विजय बाविस्कर,अनिरुद्ध पावसे, यांनी अभिनंदन केले.

### प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार १४ मे २०२६

## बिबट्या रे बिबट्या

बिबट्या रे बिबट्या
पिवळा तुझा रंग
काळ्या काळ्या ठिपक्यांनी
शोभून दिसे अंग

भारी तुझा रूबाब
चाल तुझी डौलदार
घनदाट केसांची
शेपूट शोभे झुपकेदार

भूक तुला लागता
झाडीत बसतो दडून
चपळाईने सावज धरुन
खातोस दाताने तोडून

रात्रीच्या काळोखात
डोळे चमकतात भारी
पाण्यात पोहण्याची
आवड तुझी न्यारी

झाडावर चढण्याची कला
कुठे शिकलास राव?
लहान प्राणी घाबरतात
ऐकता तुझे नाव



**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.९०११५५९१०६**

## केंद्रीय विद्यालय नाशिक रोड कॅम्पतर्फे 'ऑपरेशन सिंदूर'चा पहिला वर्धापन दिन साजरा



**नाशिक रोड :** देशभक्ती आणि अभिमानाचे उत्साही प्रदर्शन करत, तोफखाना केंद्रातील पीएमश्री केंद्रीय विद्यालय, नाशिक रोड कॅम्पने 'ऑपरेशन सिंदूर'च्या यशाच्या पहिल्या वर्धापन दिनानिमित्त शनिवारी सकाळी एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले.राष्ट्रीय सुरक्षा आणि सशस्त्र दलांच्या शौर्यावर केंद्रित असलेला हा कार्यक्रम, शाळेचे प्राचार्य गजराज मीना यांच्या दूरदर्शी मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात विद्यार्थी, शिक्षक आणि एनसीसी अधिकाऱ्यांसह मान्यवर पाहुण्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. भारतीय इतिहासातील एका महत्त्वपूर्ण क्षणाचा सन्मान करण्यासाठी सर्वजण एकत्र जमले होते.. याप्रसंगी, शारीरिक शिक्षण व आरोग्य शिक्षिका कल्पना शिंदे, शैलेंद्र यादव आणि महादेव इघारे यांनी शैक्षणिक प्रदर्शनांच्या समन्वयात महत्त्वाची भूमिका बजावली.शाळेच्या एनसीसी कॅडेट्सनी सादर केलेली शिस्तबद्ध कामगिरी हे या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण होते. एनसीसी अधिकाऱ्यांच्या कुशल देखरेखीखाली, कॅडेट्सनी देशातील तरुण आणि सशस्त्र दल यांच्यातील बंधाचे प्रतीक म्हणून 'गार्ड ऑफ ऑनर' सादर केला.याप्रसंगी मोहिमेसंबंधित छायाचित्रे आणि पोस्टर्स प्रदर्शित करण्यात आले होते. विद्यार्थ्यांसाठी एक विशेष सत्रही आयोजित करण्यात आले होते, ज्यामध्ये 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये सहभागी झालेल्या जवानांचे अदम्य धैर्य आणि ही मोहीम राबवताना आलेल्या आव्हानांविषयी सविस्तर माहिती देण्यात आली.याप्रसंगी बोलताना, प्राचार्य गजराज मीना यांनी शैक्षणिक संस्थांमध्ये अशा समारंभांच्या महत्त्वावर भर दिला. ते पुढे म्हणाले, "ऑपरेशन सिंदूरचा पहिला वर्धापनदिन साजरा करून आम्ही आमच्या विद्यार्थ्यांमध्ये कर्तव्य आणि कृतज्ञतेची भावना रुजवत आहोत. आपल्या एनसीसी कॅडेट्स आणि विद्यार्थ्यांनी ते बलिदान समजून घेतले पाहिजे, ज्यामुळे आज आपण शांततापूर्ण जीवन जगू शकत आहोत. राष्ट्राचे भावी नेते आणि संरक्षक घडवणे ही आपली जबाबदारी आहे. शाळेचे संपूर्ण वातावरण अभिमान आणि उत्साहाने भरलेले होते; हे त्या मोहिमेला दिलेली खरी आदरांजली आहे, जी आजही संपूर्ण देशाला प्रेरणा देत आहे."

## नास्तिक गाडगेबाबा

जगाला स्वच्छतेचा मंत्र देणारा
अंधश्रद्धेवर घाव घालणारा,
देव दगडात नाही म्हणणारा
ते नास्तिक संत गाडगेबाबा!

हातात खराटा, अंगावर फाटके कपडे,
विचार सूर्यापेक्षा मोठे.
भुकेल्याला भाकर दे म्हणे,
माणसात देव शोध म्हणे.
ते नास्तिक संत गाडगे बाबा

ना घंटा, ना आरतीचा गजर,
ना खोट्या चमत्कारांचा बाजार.
शिक्षण, स्वच्छता, सेवा हाच धर्म,
यातूनच उभे राहते खरे कर्म. म्हणणारे नास्तिक संत गाडगेबाबा

मंदिरापेक्षा शाळा मोठी,
ज्ञानाशिवाय दुनिया खोटी.
जातपातीत माणूस मरतो,
प्रेमानेच समाज उभा राहतो. हे सांगणारे संत गाडगेबाबा

देवासाठी बकरे
दगडासमोर तुपरोटी!
माणूस अन्नपाण्यामुळे उपाशी,
देवाला नैवेद्य !
माणसाला शिव्याशाप!
सांगणारे नास्तिक संत गाडगेबाबा

नमन त्या गाडगेबाबांना
वंदन त्या गाडगेबाबांना
ज्याने देव दगडात नाही
माणसात आहे म्हटले
त्या गाडगेबाबांना



**- डॉ. बाळासाहेब लिहिणार**

## सांगतील ते ऐकावे खरे!

अच्छे दिनाचे वास्तव चित्र,
आता दिसत आहे खास.
आता राहिले नाही कुठे,
विकास पर्वाची आस. 1

आहे त्यात जगण्याची,
सर्वांनी सराव करावे.
गॅस पेट्रोल बचत करून,
विकासाची वाट धरावे. 2

काय खावे काय घ्यावे,
सांगतील ते ऐकावे खरे.
नाहीतर तुमचा विकास,
कधी होणार नाही बरे. 3

त्यांचे म्हणणे ऐकून,
सोनं घेणं सोडून द्यावे.
अच्छे दिनाची वाट पाहत,
आनंदाने जगून घ्यावे. 4

आज नाहीतर उद्याला,
अच्छे दिन येतीलच.
पुन्हा पुढच्या प्रचारात,
आश्वासन ते देतीलच. 5

**- नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## ५३ महाराष्ट्र बटालियन एनसीसी च्या प्रशिक्षण शिबिराचा उत्साहात सांगता



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** दिनांक ०५ ते १४ मे २०२६ दरम्यान चालु असलेल्या ५३ महाराष्ट्र बटालियन एनसीसी लातूर यांच्या वतीने वार्षिक प्रशिक्षण शिबिर श्री तुळजा भवानी सैनिकी शाळा तुळजापुर येथे संपन्न झाला.लातूर बटालियन चे जवळपास ४३५ एनसीसी चे कॅडेट सहभागी झाले होते.या प्रशिक्षण शिबिराचा समारोप बुधवारी प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. समारंभाच्या अध्यक्षस्थानी कँप कमांडंट कर्नल संतोष नवगण व डेप्युटी कँप कमांडंट वाय बी सिंह होते.समारोप प्रसंगी मार्गदर्शन करताना कर्नल संतोष नवगण यांनी कॅडेटसना चरित्र, नेतृत्व ,देशभक्ती ,शिस्त , एकता ,अनुशासन, स्वच्छता,आदी गुणांचा अंगीकार करून सामाजिक व राष्ट्राच्या उभारणी मध्ये योगदान दयावे असे संबोधित केले.या कँपमध्ये अनेक विषयावर व्याख्यान घेण्यात आले प्रामुख्याने पाणी,वीज,अन्न बचत तसेच सायबर क्राईम,आपत्ती व्यवस्थापन,ट्रॅफिक नियमांचे पालन,करिअर मार्गदर्शन, आधुनिक शेती, व्यक्तिमत्व विकास या विषयावरती विशेष भर देण्यात आला या सर्व बाबीचे कॅडेटसनी आपल्या गावात, शाळेत, महाविद्यालयातुन समाजात जाऊन जनजागृती करावी असे आव्हान कर्नल संतोष नवगण यांनी केले.दहा दिवसाच्या या कँपमध्ये दिल्ली येथे होणाऱ्या प्रजासत्ताक दिन व थल सैनिक कॅडेटसची निवड करण्यात आली.या कँपमध्ये झालेल्या विविध उपक्रमात अति विशिष्ट कार्य केलेल्या कॅडेसटना प्रमाणपत्र, मेडल देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.यामध्ये बेस्ट फायरर, बेस्ट पायलट,गार्ड ऑफ ऑनर, व्हॉलीबॉल, टेबल ड्रिल, भाषण, प्रश्नमंजुषा, हार्डवर्क टिम,कँप सिनिअर यांचा गौरव करण्यात आला. कँप दरम्यान सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यात विविध शाळा व महाविद्यालयातील मुले व मुली यांनी सहभाग नोंदवून आपल्या कलागुणांना वाव देऊन उत्कृष्ट नृत्य, गायन, वादन, मिमिक्री, मूक अभिनयाचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कॅप्टन ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले व आभार कुंभार व्ही बी यांनी केले. कँपच्या यशस्वीतेसाठी सुभेदार मेजर शंभू सिंग, कॅप्टन डॉ चिट्टमपल्ले ज्ञानेश्वर, लेफ्टनंट पावडे हरिभाऊ, घोरपडे अमरसिंह, राजोळे सचिन संतोष पाटील,हरेंदर सिंह देशराज सिंह, बाजीराव पाटील,संजय चिकणे,सुनिल काळे,संभाजी शिंदे व हेडक्लार्क घोगरे बी व्ही, पवार,आर आर तसेच सर्व जेसीओ व एनसीओ , बटालियनचे सर्व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# बौद्धिक चिंतनाची गुंतवणूक व भाषिक ज्ञाननिर्मिती- डॉ. गणेश देवी

ग्रंथ हे वेगवेगळ्या प्रकारचे असतात. काही ग्रंथ हे अगदी कमी वेळात लिहिले जातात; एखाद्या आठवड्यात किंवा दोन आठवड्यात. काही ग्रंथ पूर्ण करायला लेखकाला महिने किंवा काही वर्षे लागतात. आणि काही ग्रंथ पूर्ण करायला दशकेसुध्दा पुरत नाहीत. काही लेखकांचे संपूर्ण आयुष्य तर एकच ग्रंथ पूर्ण करण्यात आणि जगापुढे आणण्यात खर्च होते. या प्रकारात मोडणारे ग्रंथ हे पुन्हा पुन्हा वाचावे लागतात. त्यांची पारायणे करावी लागतात. त्यात व्यक्त झालेले विचार, आशय आणि त्यांची एकूणच खोली समजावून घेण्याच्या दृष्टीने अशा ग्रंथांची उजळणी पुन्हा पुन्हा करावी लागते. डॉ. सुधीर देवरे यांचा ‘भाषा अहिराणी’ हा अहिराणी भाषेवरचा ग्रंथ अशा प्रकारचा आहे. या ग्रंथासाठी आणि अहिराणी भाषेसाठी त्यांनी आपले संपूर्ण बौद्धिक आणि भावनात्मक आयुष्य खर्ची घातले आहे. मी त्यांना तीन दशकांपेक्षा अधिक काळापासून ओळखतो. आणि ते इतके नम्र आहेत की त्या नम्रपणाला सीमाच नाही. फेब्रुवारी 2024 मध्ये अहिराणी भाषेचे वार्षिक संमेलन झाले. या संमेलनाचे अध्यक्ष डॉ. सुधीर देवरे होते. या पुस्तकाचा प्रारंभ या अध्यक्षीय भाषणाच्या निमित्ताने झाला असला तरी, गेल्या चार दशकातील त्यांची अहिराणी भाषेबद्दलची आस्था, चिंतन, आणि त्यातील त्यांची अविरत गुंतवणूक या ग्रंथात प्रतिबिंबीत झाली आहे. त्यांनी अनेक आठवडे रात्रंदिवस या अध्यक्षीय भाषणाच्या तयारीसाठी घालवले असे त्यांनी या भाषणाच्या सुरुवातीलाच म्हटले आहे. त्यांची प्रकृती, शारीरिक अवस्था बरी नसताना सुद्धा, चालताना त्यांना वेदना होतात, (अलीकडे ते घरातही आधाराशिवाय चालू शकत नाहीत, अशा अनेक वेदनांसहीत) तरीही या संमेलनाचे अध्यक्ष म्हणून ते हजर राहिले. यातून अहिराणी भाषेबद्दलची त्यांची भावना, धडपड या भाषेतील सर्जनात्मक आणि बौद्धिक जीवनातील त्यांची गुंतवणूक दिसते. या पुस्तकात तीन दीर्घ निबंध आहेत. यातून अहिराणी भाषेची चर्चा अनेक अंगांनी झाली आहे. इतिहास, भाषेचे उद्गमशास्त्र (भाषावंशशास्त्र), मानववंशशास्त्र, लोकसाहित्य, सांस्कृतिक भूगोल, सामाजिक- भाषाशास्त्र, व्याकरण, व्युत्पत्तीशास्त्र, तौलनिक भाषाशास्त्र अशा कितीतरी अंगाने जाणारी ही चर्चा आहे. डॉ. देवरे यांनी अहिराणी भाषेची जी चर्चा केली आहे आणि त्याचबरोबर त्यात असणाऱ्या अनेक प्रवाहांचा जो त्यांचा भाषाभ्यास आहे त्यावरून असे दिसते की, त्यांच्याकडे भाषेबद्दलची एक विलक्षण दृष्टी आहे, असे स्पष्टपणे जाणवते. तरीही, ही चर्चा विद्वजड करण्याचे त्यांनी टाळलेले आहे. हे करत असताना त्यांनी खूप काळजी घेतली आहे. कोणत्याही सर्वसामान्य वाचकाला सहज समजणाऱ्या लिखाण शैलीतील ही चर्चा आहे. हे पुस्तक वाचत असताना मला मराठीतील प्रसिद्ध आणि ज्येष्ठ कवयित्री बहिणाबाई चौधरी यांची आठवण झाली. बहिणाबाईंच्या कविता अगदी साध्या सरळ आहेत, मनाला आणि काळजाला भिडणाऱ्या आहेत. पण तरीही बहिणाबाईंच्या कवितांमध्ये असलेले शहाणपण सहजपणे व्यक्त होते. ते अगदी विद्वानांनादेखील भावते. सुधीर देवरे यांच्या लिखाणात अशीच सहजता आणि गहनता आहे. या सदगुणांचा त्यांच्या लेखनात मिलाफ आहे. या पुस्तकातील मुख्य तीन प्रकरणे तर या संदर्भात वाचकांना विलक्षण उजाळा आणि प्रत्यय देणारी आहेतच, पण त्याहीपेक्षा या पुस्तकाच्या शेवटी जोडलेल्या ग्रंथयादीचा (Bibliography) अन्वय मला अधिक भावला. अहिराणी भाषेतील महत्त्वाची पुस्तके आणि त्याचबरोबर मराठीतले मौखिक साहित्य (Oral Literature) आणि या भाषेच्या साहित्यिक परंपरेबद्दल असलेल्या पुस्तकांच्या नोंदीचा समावेश या ग्रंथ यादीत आहे. अहिराणी भाषेतील महत्त्वाच्या कवी, लेखक, अभ्यासक, संशोधकांची माहिती देऊन अहिराणी भाषा ही एक जीवंत आणि स्पंदनशील भाषा आहे याचा प्रत्यय वाचकांना व्हावा यासाठी देवरे अधिक सतर्क दिसतात असे स्पष्टपणे जाणवते. आधुनिक भारतीय इतिहासात 1950 नंतर भाषावार प्रांतरचना झाल्या. या दरम्यान बऱ्याच भाषा प्रदेशांना भाषावार प्रांतरचनेप्रमाणे न्याय मिळाला नाही. त्यांच्या भौगोलिक ओळखीकडे दुर्लक्ष झाले. हे दुःखद वास्तव विसरता येण्यासारखे नाही. याचप्रमाणे, जेव्हा संविधानातील आठव्या अनुसूचीची रचना झाली, तेव्हा अद्याप लिखित स्वरूपात न आलेल्या भाषांना त्यात स्थान मिळाले नाही. अहिराणीला दोन्ही आघाड्यांवर तोटा सहन करावा लागला. परिणामी, या भाषांना पुरेसे शासकीय समर्थन न मिळाल्याने त्या आजही अस्तित्वासाठी झगडत टिकून राहण्याच्या रांगेत उभ्या आहेत. पण खेदाने हे म्हणावे लागते की, अहिराणी ही एकटीच अशी भाषा नाही. गुजरातमधील कच्छी, कर्नाटकातील तुळू, बंगालमधील लेपचा, उत्तर प्रदेश-बिहारमधील भोजपुरी, मिजोराममधील मिजो तसेच मेघालयमधील खासी आणि गारो याही काही अशाच भाषा आहेत. गेल्या सात दशकांपासून या भाषा आपल्या हक्काच्या मान्यतेसाठी आणि अधिकृत दर्जासाठी झगडत आहेत. समृद्ध मौखिक साहित्याची परंपरा आणि लिखित साहित्याचा वारसा असूनदेखील त्यांना हा संघर्ष करावा लागतो आहे आणि हीच त्यांची नियती ठरली आहे. अशा परिस्थितीत, भाषिक चळवळीत काम करणाऱ्या आघाडीच्या अभ्यासकांनी, विद्वानांनी आणि नेत्यांनी जे विशेष कार्य केले ते महत्त्वाचे ठरते. डॉ. सुधीर देवरेंचे कार्य हे याच प्रकारात मोडते.माझी आणि डॉ. देवरेंची ओळख ही अनेक दशकांपासूनची आहे, ही मला स्वतःला भाग्याची गोष्ट वाटते. मी बडोद्याला ‘भाषा रिसर्च सेंटर’ सुरू केले तेव्हा ते नियमितपणे येत आणि विविध परिसंवाद व परिषदांमध्ये सहभागी होत. अहिराणीतील ‘ढोल’ या नियतकालिकाचे संपादन करण्याची जबाबदारी त्यांनी आनंदाने स्वीकारली होती आणि त्यांच्या योगदानामुळे ‘ढोल’चे अनेक संस्मरणीय अंक निघाले. ‘पीपल्स लिंग्विस्टिक सर्व्हे ऑफ इंडिया’ या माझ्या पुढाकारातून झालेल्या उपक्रमातही त्यांचा सहभाग होता. त्यामुळे मला त्यांच्याशी वेळोवेळी भेटून अनेक विषयांवर चर्चा करण्याची संधी मिळाली. बराच काळ मला ते विद्यापीठात प्राध्यापक असावेत असे वाटत होते. परंतु ते तसे नव्हते. मला नंतर समजले की ते टपाल व दूरध्वनी खात्यात काम करतात म्हणून. मराठीतील महत्त्वाचे लेखक दि. बा. मोकाशी घड्याळे दुरुस्त करत आणि कवी अरुण कोलटकर जाहिरात संस्थेत काम करत, हे मला माहिती होते. आपल्या देशातील विद्यापीठांकडे अशा विद्वानांचा सन्मान करण्याची काही सोय असायला हवी होती असे मला वारंवार वाटते. विद्यापीठात काम करणाऱ्या प्राध्यापकांकडून ज्ञाननिर्मितीची अपेक्षा असते. पण ही मंडळी स्वतःच्या विषयाची पुस्तकेसुद्धा वाचत नाहीत. पण जे खऱ्या अर्थाने ज्ञान निर्मिती करतात त्यांच्याकडे मात्र संस्थात्मक आणि आर्थिक पाठबळ नसते. यामुळे मन खिन्न आणि उदास होते. डॉ. देवरेंचे काम मोठे आहे. त्यांच्या साहित्यिक, भाषिक लेखनातून त्यांच्या प्रज्ञेच्या आविष्काराचा प्रत्यय नेहमीच होत असतो. त्यामुळे त्यांच्या कामाचे मोल मोठे आहे. म्हणूनच त्याचा गौरव निश्चितच होईल. अहिराणी भाषेलाही तिचा योग्य तो मान आणि सन्मान मिळेल याबद्दल मला खात्री आहे.मला याबद्दल संपूर्ण आत्मविश्वास आहे की या पुस्तकाचा प्रत्येक वाचक भारताच्या आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आकलनात अहिराणी भाषेचे असलेले अद्वितीय स्थान जाणून घेईल आणि या भाषेला योग्य तो मान मिळावा ही जाणीव आपल्या मनात दृढ करेल.-


**-डॉ. गणेश देवी**

**'The People's Linguistic Survey of India' चे मुख्य संपादक.एशियाटिक सोसायटी, मुंबईचे सीनियर फेलो.**




प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103

ADMISSION OPEN
10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses
DMLT
P.G.DMLT
X-RAY
C.T.-SCAN
E.C.G.
Radiology
Physiotherapy
Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology
Contact: 9405109103
8830838903

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार १४ मे २०२६

# ग्रंथवेध : मानवी अस्तित्वाचा वैश्विक आणि भौगोलिक शोध




प्राचार्य डॉ. मधुकर सलगर हे एक प्रगल्भ विचारवंत, व्यासंगी लेखक आणि अनुभवी शिक्षणतज्ज्ञ आहेत. त्यांच्या प्रदीर्घ शैक्षणिक आणि सामाजिक अनुभवाचा आरसा त्यांच्या साहित्यात उमटलेला दिसतो. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे आणि लेखनशैलीचे काही प्रमुख पैलू जाणवतात. डॉ. सलगर यांनी गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये तब्बल २१ वर्षे प्राचार्य या जबाबदार पदावर राहून गौरवपूर्ण सेवा बजावली आहे. सध्या ते सेवानिवृत्त असून त्यांचे वास्तव्य शांत आणि तृप्त जीवनपद्धतीकडे झुकलेले आहे. जीवनधर्म चिकित्सा; भूगोलासह हा त्यांचा १२ वा ग्रंथ आहे. त्यांच्या लेखनात प्रवासवर्णन, आत्मकथन, चरित्रलेखन, कादंबरी, काव्य आणि नाट्य अशा विविध साहित्यप्रकारांची सरमिसळ पाहायला मिळते. डॉ. सलगर यांचे लेखन केवळ वैयक्तिक नसून ते जागतिक आणि वैश्विक पातळीवरील विषयांना स्पर्श करते. खगोलशास्त्र, भूगोल, अध्यात्म, राज्यशास्त्र, समाजशास्त्र आणि विज्ञानातील विविध नियमांचा ताळमेळ घालत ते आपले विचार मांडतात. प्रख्यात लेखिका दुर्गा भागवत यांच्या भीष्मपर्व या पुस्तकापासून प्रेरणा घेऊन त्यांनी आपले लेखन प्रवाही ठेवले आहे. ते स्वत:ला पक्के गांधीवादी मानतात आणि त्यांच्या विचारांवर महात्मा गांधींच्या तत्त्वज्ञानाचा मोठा प्रभाव आहे. त्यांचे लेखन सत्यन्वेषी, ज्ञानवर्धक आणि सर्वसमावेशक स्वरूपाचे आहे. पुरस्कारांच्या मोहापेक्षा जगाचे कल्याण आणि मानवी अस्तित्वाचा शोध घेणे हा त्यांच्या लेखनाचा मुख्य उद्देश आहे. डॉ. मधुकर सलगर हे केवळ एक लेखक नसून विज्ञानाची दृष्टी आणि अध्यात्माची जोड असणारे एक ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व असून ज्यांच्या लेखणीतून मानवी जीवनाचा सखोल ऊहापोह होतो.प्रस्तावना : एक प्रगल्भ चिंतनमानवी जीवन हे केवळ श्वास घेण्यापुरते मर्यादित नसून, ते निसर्ग, भूगोल आणि वैश्विक शक्तींशी अतूटपणे जोडलेले आहे. प्राचार्य डॉ. मधुकर सलगरे यांचा ' जीवनधर्म चिकित्सा; भूगोलासह ' हा ग्रंथ याच व्यापक दृष्टिकोनाचा वेध घेतो. विज्ञानाची तर्कशुद्ध बैठक, इतिहासाची तटस्थ दृष्टी आणि अध्यात्माची विधायक जोड असलेला हा ग्रंथ एका वेगळ्या आणि समृद्ध वाणीचा अनुभव देतो. लेखकाच्या प्रदीर्घ शैक्षणिक अनुभवाचे आणि वैश्विक कल्याणाच्या ध्यासाचे हे एक प्रगल्भ प्रतिबिंब आहे.O विज्ञानाभिमुख मांडणी आणि उत्क्रांतीचा वेध :ग्रंथाची मांडणी लेखकाने विज्ञानाच्या भक्कम पायावर केली आहे. १३.८ अब्ज वर्षांपूर्वीचा ' बिग बँड ' (ब्रह्मांड स्फोट) आणि त्यातून निर्माण झालेली पृथ्वी, या शास्त्रीय तथ्यांपासून मानवी अस्तित्वाचा प्रवास लेखकाने उलगडला आहे. पृथ्वीचे वय १३.५ कोटी वर्षे असल्याचे सांगतानाच, मानवी पूर्वजांच्या (होमोइरेक्टस, होमोहेबिलिस) उत्क्रांतीचा संदर्भ देऊन हा ग्रंथ केवळ तात्त्विक न राहता वस्तुनिष्ठ बनला आहे. सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर यांच्या अंतराळ मोहिमांचा दाखला देत लेखकाने मानवी जिद्दीचे केलेले कौतुक त्यांच्या आधुनिक आणि विज्ञानवादी विचारांची साक्ष देते.O भूगोल आणि संस्कृतीचा अपूर्व संगम :ग्रंथाच्या शीर्षकातील भूगोलासह हा शब्द अत्यंत कळीचा आहे. भूगोल हा केवळ नकाशा नसून तो संस्कृतीचा निर्माता असतो, हे लेखक प्रभावीपणे मांडतात. विविध देशांतील संस्कृती तेथील भौगोलिक परिस्थितीमुळे कशी आकाराला आली, याचे सूक्ष्म विश्लेषण यात आढळते. भूकंप, त्सुनामी, नद्यांचे लुप्त होणे यासारख्या भौगोलिक घटनांची मानवी जीवनावरील अपरिहार्यता स्पष्ट करतानाच, लेखकाने भारत आणि चीन यांच्यातील ऐतिहासिक संबंधांवरही भाष्य केले आहे. चीनमधील ' टाओइझम ' आणि भारतीय संस्कृतीतील साम्य अधोरेखित करून ' हिंदी-चिनी भाई-भाई ' ही घोषणा केवळ राजकीय नसून ती सांस्कृतिक कशी असू शकते, याचे धाडसी विवेचन त्यांनी केले आहे.O सामाजिक चिकित्सा आणि सर्वधर्मसमभाव :डॉ. सलगरे यांनी सनातन वैदिक धर्माचा गौरव करतानाच, मध्ययुगीन काळात शिरलेल्या जातीय विषमतेवर कडक प्रहार केला आहे. ऋग्वेदकालीन जातमुक्त संस्कृतीचा आदर्श मांडताना त्यांनी वर्णव्यवस्थेमुळे मानवी मूल्यांची झालेली हानी स्पष्ट केली आहे. महाभारतातील द्रोणाचार्य, अर्जुन आणि एकलव्य यांच्या संदर्भातून त्यांनी सामाजिक न्यायावर केलेले भाष्य लेखकाचा निर्भीडपणा दर्शवते. जपानमधील ' शिंतो ' धर्मातील निसर्गप्रेम असो वा भारतीय वारकरी परंपरा, लेखकाने माणूस आणि मानवता हाच केंद्रबिंदू मानला आहे.आरोग्य आणि जीवनशैलीचे ' लाईफ मॅन्युअल 'केवळ तत्त्वज्ञानच नव्हे, तर मानवी शरीराचे आरोग्य, निसर्गोपचार, आयुर्वेद आणि आधुनिक वैद्यकशास्त्र यांची सांगड लेखकाने घातली आहे. युनानी, होमिओपॅथी आणि ॲक्युपंक्चर अशा विविध उपचार पद्धतींचा आढावा घेऊन ' दु:खमुक्त समाजाची ' संकल्पना त्यांनी मांडली आहे. निसर्गाशी सुसंवाद ठेवून जगणे आणि मृत्यूकडे भयाने न पाहता एका आनंदाच्या क्षणासारखे पाहण्याची दृष्टी लेखकाने दिली आहे, जी आजच्या तणावपूर्ण जगात अत्यंत आवश्यक आहे.O समीक्षात्मक टिप्पणी आणि शैली :हा ग्रंथ एकाच वेळी प्रवासवर्णन, आत्मकथन आणि तत्त्वज्ञान अशा विविध छटांनी नटलेला आहे. लेखकाची भाषा ओघवती, स्पष्ट आणि प्रांजळ आहे. हा ग्रंथ आयएसबीएन सह ९ प्रकरणांमध्ये विभागला असून ही मांडणी तर्कसंगत, वाचकाला अंतर्मुख करणारी आहे. विशेष म्हणजे, ग्रंथातील भविष्यकथन हे कोणत्याही अंधश्रद्धेवर आधारित नसून ते भौगोलिक आणि राजकीय स्थितीच्या अभ्यासावर आधारित आहे, हे या ग्रंथाचे मोठे यश आहे.जीवनधर्म चिकित्सा: भूगोलासह या ग्रंथातील गुडरम्य मायभूमी हे सहावे प्रकरण मानवी अस्तित्व, निसर्गचक्र आणि जन्म-मृत्यूच्या शाश्वत सत्याचा वेध घेणारे आहे. लेखकाने अत्यंत रोकठोक आणि वास्तववादी भाषेत जीवनाचे तत्त्वज्ञान मांडले आहे. लेखकाने केवळ जन्मभूमीला महत्त्व न देता कर्मभूमी श्रेष्ठ मानली आहे. त्यांच्या मते, भावनिकदृष्ट्या मायभूमी प्रिय असली तरी, उत्तम जीवन जगण्यासाठी आणि कर्तृत्व गाजवण्यासाठी कर्मभूमीच माणसाला आकार देते. मानवी जन्म, प्राण्यांची उत्पत्ती आणि पक्ष्यांची अंडी घालण्याची प्रक्रिया यातील जैविक समानतेवर प्रकाश टाकताना लेखकाने निसर्गधर्माला प्राधान्य दिले आहे. प्रजननाकडे केवळ शरीरधर्माची गरज म्हणून पाहताना, त्यामागील अहंकाराला त्यांनी छेद दिला आहे. मुलांना जन्म देऊन आई-वडील उपकार करत नाहीत, तो निसर्गक्रमाचा भाग आहे, हे विधान पालकांच्या भूमिकेकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन देते. निसर्गाच्या विराट रूपासमोर मानव हा अंधारात क्षणभर चमकणाऱ्या काजव्या सारखा नगण्य आहे, याची जाणीव हे प्रकरण करून देते. पंचमहाभूतांवर नियंत्रण मिळवू न शकणाऱ्या मानवाने कसला गर्व बाळगावा, असा मूलभूत प्रश्न विचारून लेखकाने मी पणाचा त्याग करण्याचा संदेश दिला आहे. क्लोनिंग सारख्या आधुनिक संकल्पनांचा उल्लेख करून लेखकाने मूळ मानवी पेशींचे महत्त्व अधोरेखित केले आहे. क्लोनला मानवी जीवनाची बी टीम संबोधून त्यांनी कृत्रिम आणि नैसर्गिक जीवनातील भेद स्पष्ट केला आहे. आफ्रिकेतून सुरू झालेला मानवाचा प्रवास आणि जगातील विविध खंड, जलभूमी व पर्यावरणातील विविधता यांचे भौगोलिक संदर्भ देत लेखकाने सर्व जीव एकमेकांवर अवलंबून असल्याचे पटवून दिले आहे.लेखक सुरुवातीलाच स्पष्ट करतात की, शारीरिकदृष्ट्या मानव चार पायांवरून दोन पायांवर उभा राहिला असला, तरी त्याच्या मनातील पशुत्व अजूनही पूर्णपणे गेलेले नाही. मानवाने स्वत:मधील या हिंस्र प्रवृत्तीवर विजय मिळवणे, हाच खरा धर्म असल्याचे लेखकाने अधोरेखित केले आहे. जोपर्यंत माणूस मनावर नियंत्रण मिळवून जितेंद्रिय होत नाही, तोपर्यंत जगात खरी शांतता नांदणार नाही, हा विचार वर्तमान काळातील युद्धांच्या पार्श्वभूमीवर अत्यंत महत्त्वाचा वाटतो.लेखकाने पृथ्वीवरील भौगोलिक विविधतेचे (खनिज संपत्ती, नद्या, समुद्र) उदाहरण देऊन हे स्पष्ट केले आहे की, निसर्गत:च जगात समानता नाही. ही विषमता केवळ निसर्गात नसून मानवी राहणीमान, शिक्षण आणि मृत्यूच्या कारणांमध्येही दिसते. विज्ञानाने मानवाला काही व्याधींपासून मुक्त केले असले, तरी शंभर टक्के मुक्ती शक्य नाही. भौतिक जगाच्या या अशाश्वत स्वरूपावर भाष्य करताना लेखक मनावर ताबा मिळवण्याच्या गरजेवर भर देतात.समाजात समता प्रस्थापित करणे हे बालकांचा खेळ नसून त्यासाठी मोठी तपश्चर्या आवश्यक आहे, असे लेखकाचे मत आहे. जो समाज केवळ भोगविलासात बुडालेला असतो किंवा जिथे वर्चस्ववादी मानसिकता असते, तिथे कधीही समता नांदू शकत नाही. सामूहिक प्रार्थना, श्रम आणि त्याग यांतूनच देश व समाज मजबूत होतो, हा मांडलेला विचार सामाजिक बांधणीसाठी दिशादर्शक आहे.हे प्रकरण वाचकाला अंतर्मुख करणारे आहे. लेखकाची भाषा साधी पण थेट आहे. अध्यात्म, भूगोल आणि जीवशास्त्र यांची सांगड घालत लेखकाने जीवनाचे जे पोस्टमॉर्टम केले आहे, ते वाचताना वाचकांच्या मनात साचलेले अनेक पूर्वग्रह गळून पडतात. अहंकार सोडून निसर्गाशी समरस होऊन जगण्याची प्रेरणा देणारे हे अभ्यासपूर्ण लेखन आहे. प्रकरणाच्या शेवटच्या भागात लेखकाने मृत्यू या अपरिहार्य सत्यावर प्रकाश टाकला आहे. नैसर्गिक मृत्यूचा स्वीकार नम्रपणे करावा, असे सांगतानाच मानवनिर्मित चुकांमुळे ओढवणारा मृत्यू टाळता येऊ शकतो, असा वस्तुनिष्ठ दृष्टिकोन येथे मांडला आहे. संकटाच्या काळात आपल्यातील उपजत क्षमता वापरून पुन्हा उभे राहणे, यातच जीवनाचे सौंदर्य आणि सामर्थ्य असल्याचे लेखक सांगतात.हे प्रकरण वाचकाला अंतर्मुख करायला लावते. केवळ बाह्य प्रगती म्हणजे विकास नसून, मानवी मनाचे शुद्धीकरण आणि निसर्गाशी असलेले नाते जपणे हीच काळाची गरज आहे, हा संदेश लेखकाने प्रभावीपणे दिला आहे. हे विवेचन आजच्या अशांत जगाला सम्यक जगण्याचा मार्ग दाखवणारे ठरते.एखाद्या ग्रंथाचे मुखपृष्ठ हे केवळ बाह्य वेष्टन नसून त्यातील विचारांचा आरसा असतो, याचा प्रत्यय जीवनधर्म चिकित्सा; भूगोलासह या ग्रंथाकडे पाहिल्यावर येतो. विज्ञानाचे तत्त्वज्ञान आणि भूगोलाची सांगड घालणारे हे मुखपृष्ठ वाचकाचे लक्ष पहिल्याच नजरेत वेधून घेते. मुखपृष्ठावर मानवी उत्क्रांतीचा प्रवास अत्यंत कल्पकतेने चित्रित केला आहे. पृथ्वीच्या गोलावरून चालणारे मानवी टप्पे हे मानवी जीवन आणि भौगोलिक परिस्थिती यांचा अविभाज्य संबंध अधोरेखित करतात. पार्श्वभूमीवरील गडद केशरी आणि पिवळ्या छटा ' ज्ञानाच्या सूर्योदयाचा ' भास निर्माण करतात. आकाशात झेपावणारे पक्षी हे मुक्त विचारांचे आणि प्रगतीचे प्रतीक म्हणून प्रभावी ठरतात. निळसर नदी आणि पृथ्वीचा गोल रंगांचा समतोल राखत वैचारिक प्रगल्भता दर्शवतात. डाव्या बाजूला दर्शवलेला पृथ्वीचा छेद (भूगर्भातील रचना) ग्रंथाच्या नावातील ' भूगोलासह ' या उपशीर्षकाला पूर्ण न्याय देतो. ही मांडणी केवळ कलात्मक नसून वैज्ञानिक दृष्टिकोनातूनही महत्त्वाची आहे. ' जीवनधर्म चिकित्सा ' हे शीर्षक पांढऱ्या आणि निळ्या छटांमध्ये अत्यंत सुवाच्य आणि ठळकपणे मांडले आहे, ज्यामुळे ग्रंथाचे गांभीर्य अधोरेखित होते.हे मुखपृष्ठ विषयाची व्याप्ती आणि लेखकाची दृष्टी यांचा उत्तम संगम आहे. छपाईचा उच्च दर्जा आणि कलाकाराची कल्पकता यामुळे हे पुस्तक केवळ वाचनासाठीच नव्हे, तर संग्रही ठेवण्यासारखे झाले आहे. जिज्ञासा जागृत करणारे आणि दर्जेदार आशयाची ग्वाही देणारे हे एक बोलके मुखपृष्ठ ठरले आहे.सारांश रूपाने, जीवनधर्म चिकित्सा हा ग्रंथ वाचकांना जगाकडे पाहण्याची एक नवी, व्यापक दृष्टी देतो. मानवी समस्या सोडवण्यासाठी माणसांनी विज्ञानाचा तर्क आणि संवेदनांची जोड देऊन एकत्र येण्याचे आवाहन लेखकाने केले आहे. हा ग्रंथ केवळ धार्मिक किंवा भौगोलिक माहिती देणारा नसून तो मानवाला माणूस म्हणून कसे जगावे, हे शिकवणारा एक ' मार्गदर्शक ग्रंथ ' आहे. जागतिक शांतता आणि बंधुत्वाचा संदेश देणारा हा ग्रंथ प्रत्येक सुजाण वाचकाच्या संग्रही असावा असाच आहे.

समीक्षक : प्रा. डॉ. महेश मोटेराज्यशास्त्र पदवी-पदव्युत्तर व संशोधन केंद्र, श्री माधवराव पाटील महाविद्यालय, मुरुमग्रंथाचे नाव : जीवनधर्म चिकित्सा; भूगोलासहलेखक : प्राचार्य डॉ. मधुकर सलगरेप्रकाशक : वेदांत प्रकाशन, डोंबिवलीपृष्ठे : २००, मूल्य : ४०० रुपयेप्रथम आवृत्ती : १४ नोव्हेंबर २०२५मुखपृष्ठ : प्राजक्ता प्रशांत रणदिवे

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार १४ मे २०२६


## यशोगाथा : सीमेवरील 'शौर्य' ते लेखणीतून 'शब्दसेवा'; कॅप्टन नरेंद्र कुमार सिद्धू यांचा थक्क करणारा प्रवास!



"जय जवान, जय किसान " हा केवळ नारा नसून ते एक जीवनसूत्र आहे, हे उत्तर प्रदेशातील मेरठ जिल्ह्याचे सुपुत्र आणि भारतीय सैन्य दलाचे निवृत्त कॅप्टन नरेंद्र कुमार सिद्धू यांच्या जीवनप्रवासाकडे पाहिल्यावर प्रकर्षाने जाणवते. गरिबीवर मात करत सैन्य दलात शिपाई ते कॅप्टन पदापर्यंत पोहोचलेल्या या योद्ध्याने केवळ शस्त्रानेच नव्हे, तर आपल्या लेखणीने आणि माणुसकीनेही समाजमनावर अधिराज्य गाजवले आहे.O हलाखीच्या परिस्थितीतून ध्येयवेध : मेरठ जिल्ह्यातील छबडिया (ता. सरधना) येथील रहिवासी असलेल्या नरेंद्र कुमार यांचे बालपण अत्यंत संघर्षात गेले. घराची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने आई-वडिलांच्या कष्टाला हातभार लावण्यासाठी ते लहानपणापासूनच धडपडत होते. शिक्षणापेक्षा कुटुंबाची जबाबदारी मोठी वाटत असल्याने त्यांनी अनेक कारखान्यांमध्ये कामासाठी विनंती केली, परंतु वय कमी असल्याने त्यांना परत पाठवण्यात आले. अखेर जिद्द न हरता त्यांनी शिक्षण सुरू ठेवले आणि बारावीत असतानाच ते भारतीय सैन्य दलात शिपाई म्हणून भरती झाले. खेळातून सुवर्णझेप आणि पदोन्नती :त्यांच्या लष्करी कारकिर्दीची सुरुवात महाराष्ट्रातील अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्ह्यातून झाली. येथेच त्यांचे खडतर प्रशिक्षण पूर्ण झाले. शिपाई म्हणून रुजू झाल्यानंतर पदोन्नतीसाठी त्यांनी मैदानावर घाम गाळला. 'ऑल इंडिया सर्व्हिसेस' मध्ये त्यांनी गोळाफेक (Shot Put) खेळात तब्बल ११ वेळा सुवर्णपदक पटकावून सैन्य दलाची मान उंचावली. त्यांची हीच खेळातील शिस्त, प्रामाणिकपणा आणि कष्ट करण्याची वृत्ती पाहून सैन्य दलाने त्यांना सुभेदार मेजर आणि त्यानंतर सन्माननीय 'कॅप्टन' पदाने गौरविले. माणुसकीचा ' कॅप्टन ': थरारक अनुभव कॅप्टन नरेंद्र कुमार यांचे हृदय अत्यंत संवेदनशील आहे. एकदा थंडीच्या कडाक्यात त्यांनी १५० गरजू लोकांना कानटोप्या वाटून माणुसकीचे दर्शन घडवले. त्यांच्या सेवाकाळातील एक प्रसंग आजही अंगावर शहारे आणतो. झाशी ते बबीना प्रवासादरम्यान रात्रीच्या वेळी घनदाट जंगलात त्यांची रिक्षा बंद पडली. हिंस्र श्वापदांचा वावर असताना इतर प्रवाशांनी पळ काढला, मात्र ड्रायव्हरला एकटे सोडणे कॅप्टनच्या तत्त्वात बसत नव्हते. स्वतःच्या जीवाची पर्वा न करता ते रात्रभर त्या ड्रायव्हरच्या सोबतीला जंगलात थांबले आणि आपला ' रक्षक ' धर्म पाळला.O निवृत्तीनंतरही समाजसेवेचा वसा :सन २००९ मध्ये सैन्य दलातून निवृत्त झाल्यानंतरही ते स्वस्थ बसले नाहीत. सध्या ते एका साखर कारखान्यात ' मुख्य सुरक्षा अधिकारी ' म्हणून कार्यरत आहेत. ६२ वर्षांचे असूनही ४० वर्षांच्या तरुणाला लाजवेल अशा उत्साहाने ते आजही शेतकऱ्यांच्या मदतीसाठी धावून जातात. साहित्याचा महामेरू : २० हजार कवितांचा विक्रमकॅप्टन सिद्धू यांची दुसरी ओळख म्हणजे एक संवेदनशील साहित्यिक. त्यांनी आतापर्यंत २० ते २५ हजार गीते आणि कविता लिहिल्या आहेत. त्यांची तीन पुस्तके प्रकाशित झाली असून, ' शौर्यगाथा ' या पुस्तकाने वाचकांच्या मनात घर केले आहे. आंतरराष्ट्रीय सन्मान आणि ओळख : त्यांच्या कार्याची दखल जागतिक स्तरावर घेण्यात आली आहे. ७३ राष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित यामध्येनासा (NASA) कडून बोर्डिंग पास, चंद्रावर आणि अंतराळात
परिचय, ऑस्ट्रेलियातील ग्रिफीथ युनिव्हर्सिटीकडून
गौरव, भारतीय टपाल विभागातर्फे त्यांच्या नावाचे व फोटोचे विशेष तिकीट प्रसिद्ध,थायलंड, इराक आणि इंडोनेशिया या देशांकडून विशेष सन्मान आदी. " जेवताना शेतकऱ्याची आणि झोपताना सैनिकाची आठवण काढावी, " हा संदेश देणारे कॅप्टन नरेंद्र कुमार सिद्धू हे आजच्या पिढीसाठी खऱ्या अर्थाने ' रोल मॉडेल ' ठरले आहेत. त्यांच्या या अष्टपैलू प्रवासाला संपूर्ण देशाचा सलाम ! शब्दांकन...

**प्रो. डॉ. महेश मोटे मुरूम, ता. उमरगा, जि. धाराशिव (महाराष्ट्र)भ्र. क्र. ९९२२९४२३६२**





बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


## जळकोट मतदारसंघातील नैसर्गिक आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत द्या; मंत्रालयातील बैठकीत जास्तीत जास्त नुकसान भरपाईची मागणी



**अतनुर (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** लातूर जिल्ह्यातील व उदगीर- जळकोट मतदारसंघातील नैसर्गिक आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत द्या; मंत्रालयातील बैठकीत जास्तीत जास्त नुकसान भरपाईची मागणीलातूर जिल्ह्यातील व उदगीर-जळकोट मतदारसंघातील नैसर्गिक आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर आज मंत्रालयात राज्याचे कृषिमंत्री दत्ता मामा भरणे यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत
अतिवृष्टीमुळे झालेल्या पीक नुकसान, जमीन खरडून झालेली हानी तसेच
शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या नुकसान भरपाईचा सविस्तर आढावा घेण्यात आला.यावेळी माजी मंत्री संजय बनसोडे यांनी लातूर जिल्ह्यातील व उदगीर-जळकोट मतदारसंघातील शेतकरी मोठ्या संकटात सापडले असून त्यांना तातडीने व जास्तीत जास्त मदत मिळावी यासाठी राज्य शासनाकडे ठोस मागणी करण्यात आल्याचे सांगितले. तसेच आ. संजय बनसोडे यांनीही शासनाने शेतकऱ्यांच्या हितासाठी तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी केली.बैठकीत मांडण्यात आलेल्या माहितीनुसार, खरीप २०२५ हंगामात उदगीर-जळकोट मतदारसंघातील जवळपास ८५ ते ९० टक्के पीक क्षेत्र नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झाले आहे. उदगीर तालुक्यात ६१ हजार ८४५ हेक्टर तर जळकोट तालुक्यात ३० हजार ८६७ हेक्टर क्षेत्रावर खरीप पेरणी झाली होती. एकूण ९२ हजार ७१२ हेक्टर क्षेत्रापैकी तब्बल ७७ हजार ८६५ हेक्टर क्षेत्र बाधित झाले असून सुमारे ६८९८.३६ लाख रुपयांच्या नुकसान भरपाईचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे.शेतकऱ्यांना पीक विमा व नुकसान भरपाई तातडीने मिळावी यासाठी बैठकीत विविध महत्त्वाच्या मागण्या करण्यात आल्या. एनडीआरएफ पंचनाम्यांची माहिती ग्राह्य धरून सर्व पीक विमाधारक शेतकऱ्यांना जास्तीत जास्त विमा मंजूर करावा, अतिवृष्टीमुळे पिकांच्या गुणवत्तेत झालेल्या घटीचाही विमा योजनेत समावेश करावा तसेच ई-पीक पाहणीतील तांत्रिक त्रुटी दूर करण्यासाठी तातडीची दुरुस्ती व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अशा सूचना बैठकीत मांडण्यात आल्या.याशिवाय गाव पातळीवर पंचनामे करण्याची व्यवस्था, पीक कापणी प्रयोगांची संख्या वाढवणे, विमा कंपन्यांवर कडक नियंत्रण ठेवणे, शेतकऱ्यांना व्याजासह भरपाई देण्याची तरतूद करणे तसेच अल्पभूधारक शेतकऱ्यांचा विमा हप्ता शासनाने उचलावा, अशा विविध मागण्या शासनाकडे करण्यात आल्या. माजी मंत्री तथा आमदार संजय बनसोडे यांनी, लातूर जिल्ह्यातील व उदगीर-जळकोट मतदारसंघातील शेतकरी नैसर्गिक संकटामुळे मोठ्या आर्थिक अडचणीत सापडले आहेत. शासनाने शेतकऱ्यांना न्याय देत तातडीने आणि जास्तीत जास्त नुकसान भरपाई द्यावी अशी भूमिका मांडली, शेतकऱ्यांच्या हितासाठी विशेष आर्थिक पॅकेज जाहीर करण्याची मागणी हि केली.विमा कंपनीने जिल्हास्तर व राज्यस्तरावर अपिल केले होते ते दोन्ही स्तरावर फेटाळण्यात आले आहेत. त्याप्रमाणे विमा कंपनीने मान्यता दिली असुन आता विमा कंपनी विमा भरपाई देण्याची कार्यवाही तातडीने करणार असल्याचे विमा कंपनि प्रतिनिधी श्री चंदन जगताप यांनी बैठकीत सांगितले. माजी मंत्री तथा आमदार संजय बनसोडे यांनी विमा प्रतिनिधी यांना लातूर जिल्ह्यातील व उदगीर जळकोट मतदारसंघातील तसेच जिल्ह्यातील सर्व विमाधारक शेतकऱ्यांना जास्तीत जास्त विमा देण्याची कार्यवाही करण्याची सूचना केली.बैठकीस कृषि सचिव श्री परिमल सिंह, कृषि आयुक्त श्री सुरज मांढरे, श्री. ज्ञानेश्वर बिरादार, सभापती, जिल्हा परिषद, लातूर, डॉ. दीपक सोमवंशी, जिल्हा परिषद सदस्य, लातूर, श्री. रामराव राठोड, माजी जिल्हा परिषद सदस्य, श्री. प्रकाश राठोड, पंचायत समिती सदस्य, उदगीर, श्री. बालाजी भोसले, तालुका अध्यक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, उदगीर, लातूर जिल्हा कृषी अधिकारी श्री राजेंद्र कदम इत्यादी जण उपस्थित होते